# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १३५–२०१०/ दिनांक :

सौ. रंजना हरिश्चंद्र जगताप,
मु.पो. कोतेन बोबलाद, जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

**<u>कोरम</u> :–** १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

सौं. रंजना हरिश्चंद्र जगताप, मु.पो. कोतेन बोबलाद, जत, जि. सांगली यांनी आपली शेती गट क्र. ५६५ मध्ये ३ अश्वशक्ती शेतीपंपासाठी वीज पुरवठा मिळावा यासाठी रु. २५०० /– + रु. २५००/– ( कदाचित रु. १५००/–) असावेत असे एकूण रु. ४०००/– दि. ५.४.२०१० पावती क्र. ५३४२३०४ नुसार भरलेले आहेत. त्यांना वि.प.ने आजतागायत वीज पुरवठा दिलेला नाही. चाचणी अहवाल देण्याची तयारी दर्शविली आहे. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र. २० दि. १०.४.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे. कक्षाने आदेश दिलेले नाहीत.

प्रस्तुतची मंचासमोर तक्रार दि. २९.६.२०१० रोजी दाखल करण्यात आली असून कृती मानके विनियमातील तरतुदीच्या कालावधीत विद्युत पुरवठा मिळावा अशी मंचाला विनंती करण्यात आली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १९.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी अनामत रक्कम भरली आहे हे मान्य केले, परंतु वि.प.कडे चाचणी अहवाल सादर केला नाही. चाचणी अहवाल सादर केल्यानंतर नियमाप्रमाणे मुदतीत वीज पुरवठा केला जाईल.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २८.७.२०१० सुनावणीस घेतली असतां, तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे प्रभारी सहाय्यक अभियंता, संख उप विभाग श्री. मैंलापुरे व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महाकांळ विभाग उपस्थित. श्री. खापरे यांनी तक्रारदार यांनी विद्युत पुरवठा मागणी अर्ज जानेवारीमध्ये केला. त्यानंतर दि. ५.४.२०१० रोजी प्रोसेसिंग फी व पावती क्र. ५३४२३०४ नुसार एकूण रक्कम रु.४०००/– भरली. दि. २३.७.२०१० ला चाचणी अहवाल दिला. त्यामुळे कृती मानकातील तरतुदीनुसार ३ महिन्यात विद्युत पुरवठा द्यावा अथवा भरपाईचे आदेश व्हावेत. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी तक्रारदाराकडून चाचणी अहवाल आल्यानंतर लाईन तयार करुन विद्युत पुरवठा दि. ९.८.२०१० पर्यंत देवू असे मंचासमोर सांगितले. वि.प.च्या म्हणण्यानुसार संयुक्त तपासणी करावयाची असून ०.१२ कि.मी. लाईन विस्ताराचे काम आहे.

श्री. खापरे तक्रारदार प्रतिनिधी यांनी असे प्रतिपादन केले की, वितरण कंपनीचे पुरवठा संहिता मधील अधिनियम १३.१.१ नुसार कंपनीने ग्राहकास नोटीस द्यावी व एल.टी. लाईन उभी करुन नंतर चाचणी अहवालाची मागणी करावी. मंचाने आदेश दिल्यास चाचणी अहवाल दिल्यानंतर कृती मानकानुसार ३ महिन्याच्या मुदतीत वि.प.ने वीज जोडणी करणेची आहे. त्यामुळे दि. २३.७.२०१० ला दिलेला चाचणी अहवा विचारांत घेऊन वि.प.ला वीज जोडणी करण्याचे आदेश द्यावेत.

मंचासमोर कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ विभाग श्री. भोसले यांनी इतर कामासाठी उपस्थित असतांना कागदपत्रांची पूर्तता व चाचणी अहवाल दिल्यानंतर लाईन उभी करुन कनेक्शन देवू असे सांगितले. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार ग्राहक यांनी एस.ओ.पी.च्या मुदतीत कनेक्शन देण्याची मागणी केल्याप्रमाणे वि.प.स आदेश देणे योग्य आहे काय ?

उत्तर : होय

आदेश ?

खालील प्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

प्रतिनिधी श्री. खापरे यांनी तक्रारदार यांनी जानेवारी महिन्यात वि.प.कडे अर्ज केल्याचे सांगितले त्यास पुरावा नाही. असो. असे असले तरी, उभयबाजूंना तक्रारदार यांनी दि. ५.४.२०१० रोजी अनामत रक्कम भरली असल्याचे मान्य आहे. तक्रारदार यांनी मोटर बसविलेचा चाचणी अहवाल सादर केला नाही या वि.प.च्या लेखी अहवालातील आक्षेपा बाबत ग्राहक प्रतिनिधी यांनी दि. २३.७.२०१० ला चाचणी अहवाल दिला त्यामुळे ३ महिन्याच्या मुदतीत विद्युत पुरवठा देणे जरुर आहे याबद्दल दुमत नाही. वि.प.ने लाईन उभी करुन व संयुक्त तपासणी करुन त्वरीत दि. ९.८.२०१० पर्यंत कनेक्शन देण्याची तयारी दर्शविली आहे. अशा परिस्थितीत, श्री. खापरे यांनी वि.प.चे विद्युत पुरवठा संहिता (कोड) अधिनियम १३.१.१ च्या तरतुदीनुसार एल.टी. लाईन उभी करुन चाचणी अहवालाची मागणी करणे याची पूर्तता झाली नाही व त्या बाबत अशी नोटीसही देण्यात आली नाही.

तरी पण कृती मानकानुसार तक्रारदार यांनी दि. २३.७.२०१० ला टेस्ट रिपोर्ट प्रमाणे संयुक्त तपासणी करुन वि.प.ने तक्रारदार यांस कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर नियमाप्रमाणे वीज जोडणी द्यावी. वि.प.तर्फे मंचासमोर दि. ९.८.२०१० पर्यंत वीज जोडणी देण्याचे तोंडी आश्वासन देण्यात आले आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देवून तक्रार मंजूर करण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता, संख उप विभाग यांनी तक्रारदार यांस कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर कृ ती मानकातील तरतुदीनुसार टेस्ट रिपोर्ट दि. २३.७.२०१० रोजी दिल्याने ३ महिन्याच्या मुदतीत वीज जोडणी द्यावी. अन्यथा तक्रारदार भरपाई मागणेस हक्कदार आहे. तक्रारदार यांनी संयुक्त तपासणी बाबत वि.प.स सहकार्य करुन कागदपत्रांची पूर्तता करावी व वि.प.ने नियमाप्रमाणे तक्रारदार यांस विद्युत पुरवठा द्यावा.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष